ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# स्वयंरोजगाराची अपरिहार्यताः आधुनिक काळाची गरज

**प्रा.डॉ. दमयंती घागरगुंडे**
*गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख*
*नबीरा महाविदयालय, काटोल, जि. नागपूर.*

*सारांश :*
*भारतात हळू–हळू सरकारी क्षेत्र कमी आणि खाजगी क्षेत्र वाढत गेले, त्यामूळे सरकारणे राश्ट्रीयकरण हे धोरण राबविले परंतु भारताची अर्थव्यवस्था ढासळत गेली आणि परकीय चलन तुटवडा हा भंयकर रित्या जाणवायला लागला. यातुनच नौक–या कमी व गळेकापू स्पर्धा सुरू झाल्या. आणि स्वयंरोजगाराची अपरिहार्यता निर्माण झाली. प्रस्तुत  ोध निबंधात परंपरागत स्वयंरोजगाराचे मार्ग आणि त्यातुन आधुनिक यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. ज्यामुळे शिक्षित, उच्च शिक्षित, श्रेणितील लोकांना त्यांच्या शिक्षणाचा लाभ होऊ शकेल. प्रस्तुत शोधनिबंध हा वर्णनात्मक संशोधन पध्दतीत दुय्यम स्त्रोत पध्दतीचा अवलंब केलेला आहे. त्यामूळे 1991 जागतिकीकरणामूळे झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर नवीन पिढी ही तंत्रज्ञानाचा अवलंब करून संभाव्य स्वयंरोगाराचा लाभ होऊ शकतात.*

***बीजशब्द :***
*जागतिकीकरण, चलन तुटवडा, खाजगी व सार्वजनिक क्षेत्र, उदारीकरण, खाजगीकरण, रोजगारसंधी*

**प्रस्तावना :**

जीवन जगण्याकरीता अर्थाजनाची गरज ही प्रत्येक मनुष्याला असते. त्याकरीता रोजगार मिळविणे यासाठी सारखी धडपड सुरू असते. स्वांतन्त्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही सामान्यपणे सर्वांनाच कुटुंब चालविण्या करीता अर्थाजन गरजेचे आहे. 1947 ला भारत स्वतंत्र झाला आणि 1948 पासून भारतात मिश्र अर्थव्यवस्था, म्हणजेच भांडवलशाही आणि समाजवाद या दोन्ही अर्थप्रणालीमधील दोश टाकुन चांगल्या गुणांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करणा–या अर्थव्यवस्थेला 'मिश्र अर्थव्यवस्था' असे म्हणतात. या अर्थव्यवस्थेत वस्तु व सेवांचे उत्पादन कार्य सरकार तसेच खाजगी क्षेत्रामार्फत घडवून आणले जाते. समाजवाद ही एक तत्वप्रणाली आहे. ज्यात सामाजिक आणि आर्थिक समता व सहकार्य वाढविण्यासाठी समाजातील संपत्तीची वाटणी व मालमत्ता हयांचे समाजाकडून नियमन करणे हे ध्येय असते. हे नियमन कामगार समिती सारख्या प्रत्यक्ष पध्दतीने बसु शकते. समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादनाच्या साधनांची मालकी ही वैयक्तिक नसून सर्व समाजाची अथवा देशाची मिळून असते.

स्वातंत्रप्राप्तीनंतर औद्योगिक धोरणाची अंमलबजावनी करण्याचे दृष्टीने खाजगी उद्योगांची स्थापना करण्यावर अनेक प्रतिबंध लावण्यात आले होते. हया निर्बंधामूळे दे  ाात खाजगी क्षेत्रामधील उद्योजगतेची म्हणावी त्या वेगाने वाढ होवू शकली नाही. श्री. पी. व्ही. नरसिंहराव प्रतप्रधान व श्री. मनमोहनसिंह अर्थमंत्री झाल्यानंतर त्यांनी सरकारच्या आर्थिक धोरणाला सर्वस्वी वेगळी दिशा दिली. उद्योगांना परवाने देण्याचे धोरण उदार करण्यात आले. अनावश्यक निर्बंध व नियंत्रण हटविण्यात आली. आयात व निर्यात व्यापारावरील निर्बंध सैल करण्यात आले. कर्जपुरवठा भरपूर व स्वस्त व्हावा यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात आली. कारण एखादे आर्थिक दृष्टया अप्रगत राष्ट्र जलद आर्थिक विकासाचा प्रयन्त करत असतांना आर्थिक नियोजन अपरिहार्य असते.

भारतात हळू–हळू सरकारी क्षेत्र कमी आणि खाजगी क्षेत्र वाढत गेले. त्यामूळे सरकारणे राष्ट्रीयकरण हे धोरण राबविले परंतु भारताची अर्थव्यवस्था ढासळत गेली आणि परकीय चलन तुटवडा हा भंयकर रित्या जाणवायला लागला. म्हणून भारताने जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले. या जागतिकीकरणाने सार्वजनिक क्षेत्र कमी झाले पर्यायाने नौक–या कमी झाल्या. आणि खाजगी क्षेत्र वाढले. व गळेकापू स्पर्धा सुरू झाल्या. रोजगाराच्या संधी नाही  या झाल्या. आणि शिक्षित अशिक्षित कुशल अकुशल सर्वच हतबल झाले. यातुनच स्वयंरोजगाराची अपरिहार्यता निर्माण झाली. स्वयंरोजगाराशिवाय कुठलाही पर्याय तरूणांपुढे उरला नाही. प्रस्तुत शोधनिबंधात हयाच समस्येवर विचार करयात आलेला आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश :**

1. आधुनिक काळातील रोजगारीच्या स्वरूपाचे अध्ययन करणे.
2. स्वयंरोजगाराच्या संभाव्य क्षेत्राची पडताळणी करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधाकरीता प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. वर्णनात्मक संशोधन पध्दतीत दुय्यम स्त्रोत पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

**स्वयंरोजगार :**
व्याख्या– एखादी व्यक्ती आपले ज्ञान, कौशल्ये, वेळ शक्ती तसेच आर्थिक आणि मानसिक/भावनिक गुंतवणूक विशिश्ट उद्दिष्टय गाठण्यासाठी करते. ज्याचा उद्देश केवळ 'टाइमपास जॉब' नसून खर्ची घातलेल्या संसाधनाचा मोबदला पैशाच्या स्वरूपात प्राप्त करणे होय. याला स्वंयरोजगार म्हणता येईल.

स्वयंरोजगार या शब्दाचा अर्थ स्वतःच स्वतःसाठी रोजगार उपलब्ध करणे आणि त्याद्वारे अर्थाजन करणे असा होतो. शिक्षणानंतर सर्वच जण नोकरीच्या शोधात असतात पण पुष्कळदा तुम्हाला तुमच्या शैक्षणिक सोग्यतेची नोकरी मिळत नाही. अशा परिस्थितीत स्वयंरोजगार हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. नोकरी न करता स्वयंरोजगाराचा मार्ग पत्करणा–यांची खरेतर खुप कमी आहे. याचे एक कारण म्हणजे समाजामध्ये स्वयंरोजगाराकडे पाहण्याचा दृष्टीकोन. आज आपल्या देशापुढे अनेक समस्या आहेत. त्यातील एक महत्वाची समस्या आहे 'बेकारी' कोटयावधी तरूण माणसे बेकार आहे. त्यात सुशिक्षित आहेत. त्याचप्रमाणे अशिक्षितही आहेत. कुशल निपून माणसे बेकार आहेत. त्याचप्रमाणे लाखो अकु ाल माणसेही कामाविना आहेत. अशी ही काम नसलेली माणसे समाजाला घातक ठरतात. कारण रिकामे डोके, रिकामे हात हे नको त्या गोष्टी करण्यास प्रवृत्त करतात अशा बेकार मंडळीतून गुन्हेगारी वाढत जाते. भारतातील लोकसंख्येचा विस्फोट हे या बेकारीचे एक कारण आहे.

बेकारीला कंटाळून चुकीच्या व आत्मघाताच्या मार्गाकडे वळण्याऐवजी अशा एखादा स्वयंरोजगार शोधावा. नौकरी करणे म्हणजे प्रतिष्ठतेचे काम ही चुकीची कल्पना पुसुन टाकली पाहिजे स्वयंरोजगार ही उत्तम आयुश्य जगण्यासाठी सुवर्णसंधी आहे. असे मनापासून मानले पाहिजे, कारण तीच आधुनिक काळाची गरज आहे. स्वयं रोजगार म्हटले की प्रत्येकाच्या नजरेसमोर येते ते अनादीकाळापासून सुरू असलेले पारंपारीक व्यवसाय, वारसाहक्काने प्राप्त झालेले व्यवयाय, प्रत्येक जातीनुसार ठरलेले स्वयंरोजगार, जोडधंदा फक्त पुरूषानेच करावयाचे स्वयंरोजगार या सर्वांचेच चित्र डोळयासमोर येते. परंतू आजच्या आधुनिक काळात तंत्रज्ञानाचा वापर जास्त वाढल्यामूळे स्वयंरोजगाराचे नवे–नवे माध्यम गवसत आहे. पारंपारीक व्यवसायाला तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामूळे वेळ व श्रमाचा कमीत कमी उपयोग करून जास्तीत जास्त कार्य पूर्ण केल्या जात आहे.

**महिती तंत्रज्ञान –**
या विभागात शालेय शिक्षणासाठी माहिती तंत्रज्ञानावा वापर, संगणकाविशयी माहिती, विविध शालेय ॲप, बोर्ड याविशयी माहिती देण्यात आलेली आहे. आता 21 व्या शतकात आणि कोरोनाच्या महामारीमुळे फळयावर शिकविण्याची पध्दत मागे पडत आहे. विद्यार्थ्यांना संगणक तंत्रज्ञान, इंटरनेट, यु–टयुब व्हिडीयोवर क्लासेसचा फायदा होत आहे. माहिती तंत्रज्ञान हे शिक्षणासाठी एक वरदान बनले आहे. तसेच या विषयात उच्चशिक्षित किंवा साधारण डिप्लोमाधारक सुध्दा स्वयंरोजगार सुरू करू शकतात. अनेक स्त्रीया यु–टयुबवर स्वतःच्या कौशल्याचा वापर करून व्हिडीयो बनवून आर्थिक उत्पन्नाचा नवीन स्त्रोत केला आहे.

गृह अर्थशास्त्राच्या विविध शाखा आणि संभसाव्य पारंपारिक स्वयंरोजगार : समग्र दृष्टीकोन

**शाखा**

**स्वयंरोजगाराच्या संधी**

1. कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन
   अ. इंटेरियर डिझाईनर आणि (गृह–व्यवस्थापन) डेकोरेटेर
   ब. पुष्परचनाकार
   क. ग्राहक सल्लागार
   ड. इवेंट मॅनेजर
2. आहार आणि पोषणशास्त्र
   अ. खाद्य पदार्थ तयार करून विकणे (अन्न उद्योग
   ब. दिर्घ मुदतीकरीता टिकाणारे पदार्थ तयार करणे
   क. डबाबंद पदार्थ तयार करणे.
   ड. आहारोपचार पुरविणे.
   इ. खाजगी प्रबोधन वर्ग चालविणे
   फ. कुकिंग क्लास चालविणे.
3. मानव विकास (बाल विकास
   अ. बालसमस्या सोडविण्यासाठी शास्त्र) पालकांसाठी सल्ला केंद्र
   ब. बालवाडी सुरू करणे
   क. किंडर गॉर्डन स्कुल सुरू करणे.
4. वस्त्र उद्योग (कापड व्यवसाय)
   अ. रेडिमेट कपडयाचे उत्पादन करणे
   ब. भरत काम करणे
   क. फॅशन डिझाईनर
   ड. संमारंभासाठी लागणारे कपडे आणि कला कुसरीच्या वस्तु तयार करणे.
   इ. वस्त्र छपाई
   फ. वस्त्र रंगविणे (बांधणी)
   ग. स्क्रीन पेंटींग/फेस मास्क रंगविणे

5. विस्तार शिक्षण आणि संवाद प्रदर्शनी शिबीरे भरविणे.
   ब. विविध विषयांवर चर्चासत्र घडविणे.
   क. कमी खर्चात उपलब्ध होणारे संसाधने पुरविणे.
   ड. महिलांसाठी योग्य विषयक शिबीरे/कार्यशाळा आयोजित करणे.
6. स्वयंरोजगार योजना / महास्वयं पोर्टल.

(Swauamrojgar#naturaltact#haktumclisath majhi ) apana : Job search India

7. महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, केंद्र व राज्य शासन अंगीकृत व्यवसाय, महामंडळे आणि बॅका यांच्या मार्फत नौकरी उत्सुक उमेदवारांना उत्तेजन देवून स्वयंरोजगाराकरीता प्रवृत्त करण्याकरीता स्वयांरोजगाराच्या विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते. (Vikaspedia) Mr. Vikaspedia.in)
8. नवीन उद्योग सुरू करावयाचा आहे ? तर सरकारच्या या योजनेचा लाभ घेण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेचा 18 ते 45 वयोगटातील स्त्री/पुरूष लाभ घेवू शकतात. ''मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम'' (सी एम ई जी पी) (CMEGP).
9. खाजगी योजना –

(dvet.gov.in) – Directorate & vocational Education and Training Maharashtra state.
(व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य)

10. मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण

**रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना**

1. कोरोना काळात मोठया प्रमाणावर लोक बेरोजगार झाले आहेत. आधीच देशात बेरोजगारी कमी नव्हती. प्रत्येक क्षेत्रात नोकरीवी संधी कमी झाली आहे.
2. जर तुम्ही शिकलेले असाल आणि जर तुम्हाला इंग्रजी, गणित, सायन्स सारख्या विशयात पारंगत असाल तर ऑनलाईन किंवा ऑफलाईन (Online Coaching) क्लास चालवू शकतात.
3. जर तुम्हाला चांगली वाक्यरचना करता येत असेल तर फेसबुक, युटयुब वर ब्लॉक लिहू शकता.
4. तुम्हाला हस्तकला किंवा त्यासांरखे काही तयार करता येत असेल तर फिलपकार्ट–ॲमेझॉन सारख्या साईडवर तुम्ही तुमची उत्पादने (डिमांड नुसार) विकु शकता.
5. आजकाल सर्वच कंपन्या या कर्मचारी प्लेसमेंट सर्व्हिसमधून हायर करतात. सरक्षा गार्ड, सफाई कर्मचारी, हेल्पर आदी टेक्निकल लोक हे अ ाच प्रकाश भरले जातात. तुम्ही तुमच्या घरात प्लेसमेंट एजन्सी सुरू करू भाकता.
6. जर तुमची हिंदी, मराठी, इंग्रजी भाषेवर चांगली पकड असेल तर तुम्ही कोणत्याही भाशेत अनुवाद करू शकत असाल तर ऑनलाईन ट्रान्सलेटर बनून कंपनीत पार्टटाईम जॉब करू भाकता.
7. आता टेक्नोलॉजीचा जमाना आहे जर तुम्ही वेबसाईट डिझाईनर किंवा डेव्हलपस्वी मोठी मागणी आहे. त्याचे क्लास करून शिकल्यावर तुम्ही मोबाईल ऐप आणि वेबसाईट बनविण्यास सुरूवात करू शकता.

**निष्कर्ष** –

1991 नंतर जागतिकीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्र कमी झाल्यामूळे स्वयंरोजगाराशिवाय पर्याय नाही. त्याचप्रमाणे अलिकडच्या काळात प्रत्येक क्षेत्रा आमुलाग्र बदल झालेले आहेत. त्या बदलाच्या पार्श्वभूमीवर नव–नवीन स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या आहेत. नवीन पिढीने रोजगार म्हणून सृजन ालनतेचा अवलंब करून या संभाव्य स्वयंरोगराचा लाभ घेवू भाकतात.

**संदर्भ : (References)**


1. *प्रा. प्रभाकर देशमुख, उद्योजकता विकास, पिंपळापूरे ॲण्ड कं., पब्लिशर्स, नागपूर PP-534*
2. *प्रा. जीवन मुळे, मासिक–उद्योजक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र याचे प्रकाशन Aug 2021; PP – 27.28*
3. *http//ps://mr.vikadpedia.in7education.*
4. *http//ps :# www.marathigyaan.com*
5. *Marathi Blog: arathiamhimarathi.blogspot.com*
6. *मिश्र अर्थव्यवस्था, विकिपीडीया (mr. m.wikipedia.org)*
7. *आर्थिक जागतिकीकरण, 3 from economiatinanzas.com.*
8. *(त्रिवेणी फरकाडे, सुलभा गोंगे, कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन आणि गृहसजावट, पिंपळापूरे ॲण्ड के. पब्लिशर्स, PP-189*